जा.क्र./पोउआ/वाह/नियोजन/२९८८/२०२०

**प्रेसनोट** दिनांक - १७ /०७/२०२०

वाकड पोलीस स्टेशन कार्यक्षेत्रातील थेरगाव परिसरात पडवळनगर, सुंदर कॉलनी, गणराज कॉलनी,दगडुपाटील नगर, क्रांतीवीर नगर सदरचे भागात कोरोना विषाणु बाधिक लोक मिळुन आले आहेत. पिंपरी चिंचवड शहरामध्ये दि.१४/०७/२०२० ते दि.२३/७/२०२० रोजी पर्यंत लॉकडाउन जाहीर करण्यात आलेला आहे.

ज्याअर्थी पिंपरी चिंचवड शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सी आंर - ३७/टी आर ए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन प्राप्त हरकती व सुचनांचा विचार करुन मी सुधीर हिरेमठ पोलीस उप-आयूक्त वाहतुक शाखा, पिपंरी चिंचवड शहर,यापुर्वी काही निर्बंध असतील ते रद्द करण्यात येत असुन तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहीका, वैद्यकीय सेवेतील स्टाफ, इ.) खेरीज करुन तात्पुरत्या स्वरुपात आदेश काढण्यात येत आहे.

**पिंपरी,सांगवी वाहतुक विभाग अंतर्गत**

**कोरोना रोगाचे वाढते प्रादुर्भावाचा विचार करता काळेवाडी –पिंपरी या दोन गावांना जोडणारे पुल अनुक्रमे १.काळेवाडी पिंपरी पुल लकी बेकरी जवळ २. पवनेश्वर काळेवाडी पुल हा सार्वजनिक वाहतुकीकरीता दि.१४/०७/२०२० ते दि.२३/७/२०२० रोजी पर्यंत बंद करण्यात येत आहे.**

Shiremath

(सुधीर हिरेमठ) भा.पो.से.
पोलीस उप-आयुक्त, वाहतूक
पिंपरी चिंचवड

प्रति,

जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी, नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१.

प्रत :

१) मा. पोलीस आयुक्त सो,पिंपरी चिंचवड शहर

२) पोलीस निरिक्षक, प्रेसरुम, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.

/-सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमान पत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

३) प्रभारी अधिकारी पिंपरी वाहतुक विभाग व सांगवी वाहतुक विभाग

४)कार्यकारी अधिकारी, ड क्षेत्रीय कार्यालय, मनपा

/- सदर ठिकाणी वरील वाहतुक निर्बधाचे फलक बसंविणेची कार्यवाही होणेस विनंती आहे.